(५५१)

20.7310066
77.0172 26.

श्री.तेजुसिंग पवार, उपविभागीय अधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला.

रामाक्र- एनओपी-३४/उमरी प्र.अ./२५/२००४-२००५

अर्जदार :- श्री.संजय रामराव घाटोळ रा. लहान उमरी अकोला.

## आदेश

(पारित दिनांक 10 माहे फेब्रुवारी २००६)

आवेदक श्री.संजय रामराव घाटोळ रा. लहान उमरी अकोला. यांनी त्यांचे मालकीच्या मौजे उमरी प्र.अ. ता.जि.अकोला येथील शेत सर्व्हे नं. ८२/२-४ यातील एकुण क्षेत्रफळ ०.६५ हे.आर. या शेजमिनीचे निवासी प्रयोजनाकरीता अकृषक वापराची परवानगी मिळणेसाठी विहीत नमुण्यात अर्ज सादर केला आहे, अर्जासोबत अर्जदाराने मालकीहक्काबाबत ७/१२ उतारा, २. टिपण उतारा, ३. मोजणी शिट (ड) प्रत, ४. प्रस्तावित भुखंडक अभिन्यासाचे प्रती संलग्न केलेल्या आहेत. प्राप्त अर्जाचे अनुषंगाने प्रकरण पंजीबध्द करुन घेण्यात येऊन प्रकरणात पुढील चौकशी/कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

२. प्रकरण तपासणी करुन अकृषक निवासी परवानगीबाबत पुढील कार्यवाही सुरु करण्यात येऊन, मामल्यात सदरच्या प्रस्तावित जमिनीचे बाबतीत दिनांक ७.१.२००५ रोजी जाहीरनामा काढुन तहसिलदार अकोला, सचिव ग्राम पंचायत खरप बु, संबंधित गाव तलाठी उमरी प्र.अ. यांचेकडे प्रसिध्दीस पाठविण्यात आला. तसेच कार्यालयाच्या सूचना फलकावर लावुन प्रसिध्द करण्यात आला.

३. आवेदकाने सादर केलेल्या भुखंडक अभिन्यासांबाबत संबंधित विभाग/कार्यालये यांचेकडुन अभिप्राय मागविण्यात आले आहेत व मामल्यासह ठेवले आहेत. संबंधित विभाग/कार्यालय यांचेकडुन प्राप्त अभिप्राय-अहवाल बाबत खालील प्रमाणे माहिती विवेचन देण्यात येत आहे.

अ) सहाय्यक संचालक, नगर रचना अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक अकृपीक/मौजे उमरी प्रअ. स.क्र.८२/२-४ ससंअ जा.क्र.६९५ दिनांक ५.४.२००५ नुसार प्रकरणात प्रस्तावित भुखंडक अभिन्यासास तांत्रिक मंजुरी प्रदान करुन प्रस्तावित भुखंडकाप्रमाणे तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख अकोला यांचेकडुन भुखंडक निहाय मोजणी करुन घेण्याकरीता कळविले.

अ-१) प्रकरणात तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख अकोला यांनी मो.र.क्र. ४१०/२००४-२००५ दिनांक १३.१०.२००५ जा.क्र.२४२२ दिनांक २५.१०.०५नुसार प्रत्यक्ष मोक्यावर जाऊन भुखंडकनिहाय मोजणी करुन पत्र नुसार मुळ क प्रत या कार्यालयास सादर केली आहे.

अ-२) प्रकरणात प्राप्त भुखंडक निहाय मोजणीच्या क प्रती प्रमाणे अर्जदार यांनी सिमांकित अभिन्यास या कार्यालयास अंतीम मंजुरीसाठी सादर केले असता, सिमांकित अभिन्यासाच्या प्रती सहाय्यक संचालक नगर रचना अकोला यांना अंतिम मंजुरीचे शिफारसीसाठी पाठविण्यात आल्यात. त्यानुसार त्यांचेकडील पत्र क्र.अकृषी/मौजा उमरी प्र.अ. /स.क्र.८२/२-४ जा.क्र.२१७९ दिनांक २५.११.२००५ नुसार नेहमीच्या अटी व शर्थीस अधिन राहून सिमांकित अभिन्यासास अंतीम मंजुरी देऊन निवासकामी अकृषक

..२.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER सत्यमेव जयते AKOLA

10/2/06

Scanned with OKEN Scanner

आकारणी निर्धारित करुन देण्यासाठी शिफारस केली आहे. तत्पुर्वी प्रकरणात खालील विभागाकडुन अभिप्राय-अहवाल मागविण्यात आले असुन त्यांनी खालील प्रमाणे अहवाल दिले आहेत.

ब) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्र.जिप/आवि/अकृषक/२७४७/२००५ दिनांक १८.५.०५ नुसार मौजे उमरी प्र.अ. शेत सर्व्हे नं.८२/२-४ क्षेत्र ०.६५ हे.आर. अकृषकतेच्या विस्तारास प्रस्तावित असलेली जमिन आरोग्यदृष्टया योग्य असल्याचे कळविले आहे.

क) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्र.का.अ./अकोला शहर/तांत्रीक-२/२८०४/ दिनांक २७.४.२००५ नुसार प्रस्तावित जमिनीचे अकृषक आकारणीसाठी रुपांतर करण्यास हरकत नाही असे अभिप्राय दिले आहेत.

ड) उपविभागीय अभियंता, विशेष प्रकल्प उपविभाग, अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्र.५९१/ता.दि.३०.४.०५ नुसार सदर स्थान राष्ट्रीय महामार्गापासुन ४.०० कि. मि. दुर अंतरावर असल्यामुळे पोचमार्गासाठी महामार्गाचा वापर करणार नसल्यामुळे नाहरकत प्रमाणपत्र देण्यास हरकत नाही, असे अभिप्राय दिले आहे. त्याच अनुषंगाने कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग क्र.१३ अमरावती हयानी त्यांचे कडील पत्र क्र.१५७८/तां. अनुरेखक-२ दि. ७.६.२००५ नुसार सदर स्थान राष्ट्रीय महामार्गापासुन ४.० कि.मी. दुर अंतरावर असल्यामुळे सदर बाबतीत त्यांचे अभिप्राय निरंक समजण्यात यावे असे कळविले आहे.

इ) विशेष भुमि संपादन अधिकारी (का.पु.मो.प्र.) अकोला यांनी त्यांचे पत्र क्र.अका/विभुसंअ/कापुमोप्र/कावि-५५०/२००५ दिनांक २.६.२००५ नुसार सदरहु प्रस्तावित जमिनीचे भुसंपादन करावयाचे प्रकरण सुरु नसुन, भूसंपादन करण्याचे प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत असे कळवुन, यापुर्वी सदर जमिन अर्जित करण्यात आली आहे किंवा कसे याबाबत आपले स्तरावर पडताळणी करुन घ्यावी असे अभिप्राय दिले आहेत.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER
सत्यमेव जयते
AKOLA

10/2/06

ई) पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-२८/पुनर्वसन/आस्था/कावि-३२७/२००५ दिनांक ४.५.२००५ नुसार मौजे उमरी प्र.अ. येथील शेत सर्व्हे नं.८२/२-४ मधिल क्षेत्र ०.६५ हे.आर. हयाचा लाभ क्षेत्रातील अतिरीक्त जमिन म्हणुन संपादनाचा कोणताही प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला नाही, असे अभिप्राय दिले आहे.

ग) कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्र.१९०८/रेशा/अकृषक/०५ प्राप्त दिनांक ३१.३.२००५ अन्वये मौजे उमरी शिवारातील शेत सर्व्हे नं.८२/२-४ यातील क्षेत्र ०.६५ हे.आर. शेतजमिन या विभागा अंतर्गत पुर्ण झालेले तसेच बांधकामधिन असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात किंवा लाभक्षेत्रात येत नाही, त्यामुळे सदर जमिनीस अकृषक परवानगी देणेस या विभागाचे दृष्टीने हरकत नाही, असे कळविले आहे.

ह) प्रकरणात मंडळ अधिकारी अकोला यांनी सविस्तर मौका पाहणी अहवाल तसेच मालकीहक्क अभिलेख तपासणी करुन दिनांक ३०.९.२००५ नुसार अहवाल सादर केला, आपले अहवालात त्यांनी सदरहू जमिनीचा मुळधारणअधिकार हा वर्ग-१ संज्ञेतील असल्याचे स्पष्ट करुन, सदरहू मिळकत ही अर्जदारास वारसहक्कान्वये मिळाली असुन सदर क्षेत्र आज रोजी गट ग्राम पंचायत खरप बु. हद्दीत समाविष्ट असल्याचे अहवालीत केले आहे.

..३..

Scanned with OKEN Scanner

१५२



ज) प्रकरणात सरपंच गट ग्राम पंचायत खरप बु. ता.जि.अकोला ह्यांनी ठराव क्र.४ दिनांक २६.२.२००५ नुसार सदरहू जमिनीचे अकृषक आकारणीस रुपांतर करण्यास गट ग्रामपंचायत खरप बु. यांची नाहरकत असल्याचा ठराव दिलेला आहे.

त) प्रकरणात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांनी त्यांचेकडील पत्र क्र. ३४९२/तां.स.आ-२ दि. २४.५.२००५ अन्वये मौजे उमरी प्र.अ. शेत सर्व्हे नं.८२/२-४यातील क्षेत्र ०.६५ हे.आर. जमिनीस नेहमीचे अटीचे अधिन राहून नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे.

थ) मुख्याधिकारी, अमरावती गृहनिर्माण क्षेत्र व विकास मंडळ, अमरावती ह्यांनी सदरहू जमिन म्हाडाचे भु-संपादनात समाविष्ट नसल्यामुळे अकृषक आकारणीस रुपांतर देणेबाबत हरकत नाही असे अभिप्राय पत्र क्र.४५४ दिनांक प्राप्त दिनांक ९.३.२००५ नुसार दिले आहेत.

प्रकरणात संबंधित जमिनीचा जाहीरनामा दिनांक ७.१.२००५ प्रसिध्दीनुसार कोणाचेही कोणतीही हरकत अथवा आक्षेप विहीत मुदतीत किंवा हितसंबंध आता पावेतो या कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत.

सदर प्रस्तावित क्षेत्र मौजे उमरी प्र.अ. येथील शेत सर्व्हे नं. ८२/२-४ मधिल क्षेत्र ०.६५ हे.आर. जमिनीस बिनशेती निवासकामी परवानगी देण्याचे दृष्टीने ग्रामीण भागातील गैरनागरी क्षेत्रातील अकृषक कर आकारणी प्रमाणदर १९९१ चे प्रमाणदराप्रमाणे आकारणी निर्धारित करुन देण्याचे शासन निर्देश आहेत. तसेच प्रकरणातील निवासी वापर करण्यात येणा-या अकृषक आकारणीचा तपशिल खालील प्रमाणे विवरणात नमुद केलेला आहे, परंतु यानंतर शासनाचे वेळावेळी प्राप्त होणारे अकृषक कर आकारणी वाढीबाबतच्या आदेशाचे अनुपालन करणे सर्व आवेदकास तसेच संबंधितांना बंधनकारक राहील.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER
सत्यमेव जयते
AKOLA

Abhimi
10/2/06

| विवरण | जमिनीचे क्षेत्रफळ चौ.मि. | अकृषक कर आकारणी रुपये ०.०४ पैसे प्रति चौ.मि. |
|---|---|---|
| मौजे उमरी प्र.अ. येथील शेत सर्व्हे नं.८२/२-४ मधिल क्षेत्र | ६५००.०० | |
| १) निवासी क्षेत्र/भुखंडखालील क्षेत्र | ३८०१.०० | १५३.०० |
| २) खुल्या जागेचे क्षेत्र | ६५०.०० | – |
| ४) रस्ते व कल्वेचर खालील क्षेत्र | २०४९.०० | – |
| एकुण | ६५००.०० | पुर्णांकित रक्कम १५३.०० |

४. जमिन अकृषक रुपांतरणाखालील अभिन्यासांतर्गत खुली जागा व रस्त्याखालील जागा सार्वजनिक वापरात येत असल्याने ह्या जमिनीवरील अकृषक कर आकारणीस महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ११७(४) अन्वये खाली नमुद विवरणात दर्शविल्याप्रमाणे अकृषक आकारणीतुन सुट देण्यात येत आहे.



Scanned with OKEN Scanner

| विवरण | क्षेत्रफळ | सुट दिलेला आकार/कर |
|---|---|---|
| १) रस्ते व कव्हेंचर खालील क्षेत्र | २०४९.०० | ८२.०० |
| २) खुल्या जागेचे क्षेत्र | ६५०.०० | २६.०० |

मंजुर केलेल्या अभिन्यासातील निवासी भुखंडावर अकृषक कर आकरणीचा तपशिल या आदेशासोबतच्या प्रपत्र अ मध्ये दर्शविलेला आहे.

५. सदर प्रकरणात प्रस्तावित जमिनीबाबतचे मालकीहक्क, आवेदकांनी सादर केलेले कागदपत्रे, मंडळ अधिकारी यांचे चौकशी अहवालानुसार आवेदकांचे जमिनीचे मालकीहक्क व जमिनीचे भोगवटदार वर्ग-१ चे खातेदार असल्याचे स्पष्ट होत असुन कोणताही बोजा दर्शविलेला आढळत नाही. त्यांचे अभिन्यासात आवेदकांनी उक्त जमिनीवर विज, पाणी, रस्ते व नाल्या ई.सोयी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

६. सबब उपरोक्त माहिती-अहवालान्वये मी, तेजुसिंग पवार, उपविभागीय अधिकारी अकोला या द्वारे महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ (२) अन्वये मौजे उमरी प्र.अ. ता.जि.अकोला येथील शेत सर्व्हे नं. ८२/२-४ यातील क्षेत्र ०.६५ हे.आर. या शेतजमिनीचे आवेदक श्री. संजय रामराव घाटोळ रा. अकोला यांना निवासी प्रयोजनासाठी अकृषक वापर करण्यासाठी खाली नमुद शर्ती व अटीवर परवानगी मंजुर करीत आहे.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER सत्यमेव जयते AKOLA

(signature) 10/2/06

अटी व शर्ती :-

१. सदरची परवानगी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ व त्याखालील प्रचलित नियमाच्या तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

२. उक्त जमिन ज्या कारणास्तव अकृषीक वापर करण्याची परवानगी देण्यात आली आहे, त्याच निवासी प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावा. सदर जमिनीचा निवासप्रयोजनाखेरीज इतर दुस-या कारणासाठी उपयोग/वापर उपविभागीय अधिकारी अकोला यांचे पुर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.

३. जमिनीच्या सिमांकित मंजुर अभिन्यासातील भुखंडकाचे विभाजन उपविभागीय अधिकारी यांचे पुर्व परवानगीशिवाय वापर करता येणार नाही. मात्र विभाजन करावयाचे झाल्यास व तसा अर्ज प्राप्त झाल्यास, सदरचे आदेशातील अटी व शर्तीचा तसेच महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम व इतर संबंधित नियमांच्या तरतुदीचा भंग होऊ न देता परवानगी देण्यास उपविभागीय अधिकारी सक्षम असतील. सक्षम अधिका-याचे पुर्व परवानगीशिवाय भुखंडकाचे विभाजन करता येणार नाही.

४. आवेदकानी सादर केलेल्या अभिन्यासानुसार तसेच तालुका निरीक्षक भुमि अभिलेख अकोला यांनी जागेवर तात्पुरत्या मंजुर अभिन्यासाप्रमाणे केलेल्या भुखंडनिहाय मोजणी करुन क प्रतीसह अहवाल सादर केला, त्याप्रमाणे अर्जदार यांनी सिमांकित अभिन्यास सादर केलेत. सदरहू सिमांकित अभिन्यासास सहाय्यक संचालक नगर रचना अकोला यांनी अंतीम मंजुर करुन अकृषक आकारणीसाठी शिफारस केल्यानुसार उक्त जमिनीची निवासकामी अकृषक वापराची परवानगी देण्यात येत आहे. जर जागेच्या हद्दीबाबत काही तक्रार अथवा कायदेशीर अडचण निर्माण झाल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहील.



Scanned with OKEN Scanner

५. आवेदक/भुखंडधारक यांना जागेवर बांधकाम करण्यापुर्वी स्थानिक प्राधिकरणाकडुन बांधकामाबाबतचे नकाशे, बांधकाम नियमावली प्रमाणे मंजुर करुन घेणे बंधनकारक राहील.

६. अभिन्यासातील भुखंडात बांधकाम करतांना फ्लॅय ॲश ब्रिक्स (Fly Ash Bricks)चा वापर करणे आवेदकास/भुखंडधारकांस बंधनकारक राहील.

७. अभिन्यासातील खुल्या जागा, रस्ते, लहान पुल, नाल्या इत्यादीचा विकास जमिन मालकाने स्वखर्चाने करुन महसुल विभागाचे प्रमाणित मापदंडानुसार करुन व्यवस्थापनाकरीता स्थानिक प्राधिकरणाकडे नाममात्र शुल्क रुपये १.०० चे मोबदल्यात हस्तांतरीत करावी. त्यानंतरच भुखंडक विक्री/वाटप करता येईल.

८. अभिन्यासातील सार्वजनिक वापरासाठी प्रस्तावित केलेल्या खुल्या जागेचा वापर खुली जागा/क्रिडांगण या करीताच करण्यात यावा. त्यावर कोणतेही कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

९. सदर सिमांकित मंजुर अभिन्यासामधील रस्ते, खुली जागा, बाजुचे इतर अभिन्यास यांचेशी समन्वय साधुन सर्वांकरीता वापर/खुले ठेवणे बंधनकारक राहील.

१०. सिमांकीत मंजुर अभिन्यासातील जागेच्या विकासाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमानुसार संबंधित स्थानिक प्राधिकरणांकडे विकास शुल्क भरुन बांधकामाची आवश्यक परवानगी प्राप्त करुन घ्यावी लागेल.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER
सत्यमेव जयते
AKOLA

११. सिमांकित मंजुर अभिन्यासातील सार्वजनिक कामाकरीता राखुन ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासाखालील जागेच्या एकुण क्षेत्रफळाच्या १० टक्केपेक्षा कमी ठेवता येणार नाही.

१२. सदर प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला यांचे नाहरकत प्रमाणपत्र दिनांक २४.५.०५ नुसार खालील अटीचे पालन करणे आवेदकांस/भुखंडधारकांस बंधनकारक राहील.

(१) प्रस्तावित लेआऊट हे ग्रा.मा. मार्ग क्र.१२५ च्या मध्यापासुन पासुन १०० मिटर अंतरावर आहे.

(२) सदर लेआऊट रस्त्याच्या मध्यापासुन १०० मिटर अंतरावर आहे, त्यामुळे इमारत रेषेच्या बाहेर आहे.

(३) सदर लेआऊटचे पोच मार्गावर हयुम कल्व्हटचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाचे परवानगीनेच करण्यात यावे.

(४) भविष्यात या मार्गाचे रुंदीकरण करावयाचे असल्यास रस्त्याचे रुंदीकरणात कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

10/2/06

१३. अभिन्यासामधील जागेवर अथवा नियमबाह्य बांधकाम केल्यास आवेदक/संबंधित भुखंडधारक यांचे विरुध्द प्रचलित नियमान्वये कार्यवाही करण्यात येईल, त्याबाबतचा शासनास येणारा खर्च जमिन महसुल म्हणुन वसुलीस पात्र राहील व आवेदक अथवा संबंधित भुखंडधारक यांना त्यांचा भरणाकरणे बंधनकारक राहील.

१४. भुखंडावर बांधकाम करतांना खालील प्रमाणे समासाची अंतरे सोडणे भुखंडधारकस बंधनकारक राहील.



Scanned with OKEN Scanner

| भुखंडाचे क्षेत्रफळ (चौ.मिटर मध्ये) | समोरुन/रस्त्याकडुन सोडावयाचे अंतर | मागील बाजुने सोडावयाचे अंतर | दोन्ही बाजुने सोडावयाचे अंतर |
|---|---|---|---|
| ४५०.०० चौ.मि. पेक्षा जास्त | ४.५० मिटर | ४.५० मिटर | ३.०० मिटर |
| ३००.०० चौ.मि. पेक्षा जास्त | ४.५० मिटर | ३.०० मिटर | २.२५ मिटर |
| १५०.०० चौ.मि. पेक्षा जास्त | ३.०० मिटर | १.५० मिटर | १.५० मिटर |
| १००.०० चौ.मि. पेक्षा कमी आकाराचे भुखंडक | ३.०० मिटर | १.५० | एका बाजुने सामाईक भिंत व दुस-या बाजुने १.५० मिटर. |

१५. अभिन्यासातील जमिनीवर निव्वळ निवासी प्रयोजनार्थ क्षेत्र ३८०१.०० चौ.मिटर आहे. सन् १९९१ च्या अकृषक आकारणीच्या प्रमाणदराप्रमाणे अकृषक आकारणीदर प्रमाणदराइतका आहे, त्याप्रमाणे ०.०४ पैसे प्रति चौ.मि. प्रमाणे अकृषक कर पुर्णांकित रक्कम १५३/- (रुपये एकशे त्रेपन्न फक्त). तसेच जिल्हा परिषद सेस अकृषक आकारणीचे ७ पटीत म्हणजे १०६५/- (रुपये एक हजार पासष्ट फक्त) निश्चित होत आहे, तसेच ग्राम पंचायत सेस रुपये १५३/-(रुपये एकशे त्रेपन्न फक्त) प्रतिवर्ष आकारणी निश्चित होत असुन, आवेदकास प्रतिवर्ष अकृषक कर आकारणीचा भरणा करणे बंधनकारक राहील. तसेच यासंबंधी शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील. आवेदकाने सदरक्षेत्राचे रुपांतरणाबाबत अकृषक आकारणीच्या पाचपटीत रुपांतर कर रक्कम रुपये ७६१/- (रुपये सातशे एकसष्ट फक्त)चा भरणा करणे बंधनकारक राहील.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER
सत्यमेव जयते
AKOLA

10/2/06

१६. सदरच्या जागेबाबत सध्याच्या प्रचलित दराने अकृषक आकारणी निर्धारित करुन देणेत आली आहे, परंतु यासंबंधी शासनाचे वेळोवेळी प्राप्त होणारे अकृषक आकारणी वाढीबाबतचे आदेशाचे अनुपालन करणे आवेदकांस तसेच संबंधित भुखंडकधारकांना बंधनकारक राहील व सदरहू निर्धारित करुन देण्यात आलेली आकारणी शासनाचे आदेशानुसार फेरबदलास/पुर्नविलोकनास पात्र राहील, सबब यासंबंधी वेळोवेळी शासनाकडुन निर्गमित होणारे नियम व अटीचे पालन करणे भुखंडधारकास बंधनकारक राहील.

१७. आवेदकाने प्रस्तावित जमिनीचा प्रत्यक्ष अकृषक वापर एक वर्षाचे आंत करावा. व तसे केल्याबाबतचा अहवाल जमिनीचा वापर सुरु केल्यापासुन एक महिण्यात या कार्यालयास संबंधित तलाठी/तहसिलदार यांचेमार्फत सादर करावा, तसे न केल्यास महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ नुसार कार्यवाही करण्यात येईल.सदर अभिन्यासमधील भुखंड अभिन्यासमधील भुखंडविक्री करण्यापुर्वी जमिनीचे विकास अंतर्गत पाणी पुरवठा, विजपुरवठा, अंतर्गत रस्ते, नाल्या सोई उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आवेदकाची राहील.

१८. सदर अभिन्यासमधील जमिनीचा विकास आवेदकाने परवानगी दिनांकापासुन एक वर्षाचे आंत करावा व तसा अहवाल संबंधित तलाठी/तहसिलदार यांचे मार्फत सादर करावा अन्यथा सदरची परवानगी ही एक वर्षानंतर आपोआप व्यपगत होईल



Scanned with OKEN Scanner

(१५६)



२१. वरीलपैकी कोणतही अटीचे/शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त बाबतीत नियमानुसार उपविभागीय अधिकारी जो दंड आकारतील त्याचा भरणा करणे आवेदकास बंधनकारक राहील अथवा आदेशातील अटीचे उल्लंघन केल्यास आदेश रद्द केल्या जातील. त्यामुळे होणा-या सर्व परिणामाची संपुर्ण जवाबदारी आवेदकाची राहील.

विशेष अट १. प्रकरणांतर्गत आवेदकाने सादर केलेले मालकीहक्काबाबतचे कागदपत्र अभिलेखावरुन जमिन त्यांच्या ताब्यातील व मालकीची असल्याचे दिसुन येते. तथापी भविष्यात जमिनीबाबत/जमीनीचे मालकीहक्क, वारसहक्क, जमीनीच्या हद्दीबाबत किंवा अन्य बाबीचे वादामुळे कोणत्याही हक्कास बाधा आल्यास तसेच आवेदकाने सदरचे आदेशातील अटी व शर्ती तसेच नगर रचना कार्यालयाने दिलेल्या अटी व शर्थीचे उल्लंघन केल्यास सदर निवासी प्रयोजनार्थ अकृषक वापराची परवानगी आपोआप रद्द होतील.

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER AKOLA सत्यमेव जयते

10/2/06
उपविभागीय अधिकारी
अकोला.

प्रतिलीपी :- मा.जिल्हाधिकारी अकोला यांना माहितीसाठी सविनय सादर
१. सहाय्यक संचालक, नगर रचना अकोला
२. तहसिलदार अकोला
३. सचिव, गट ग्राम पंचायत खरप बु., ता.जि.अकोला
४. तलाठी मौजे उमरी प्र.अ. मार्फत तहसिलदार अकोला
५. अर्जदार- श्री.संजय रामराव घाटोळ रा.अकोला.

यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत.

10/2/06
उपविभागीय अधिकारी
अकोला.

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग अकोला शाखा
आवक क्र. ...६१५...
दिनांक ...२०/३/०६...
फाईल नं. ...

२०१२ (ई)
स.सं.न.र.
न.र.
27/03

[redacted]

१५८

..८.. प्रपत्र अ

विषय :- मौजे उमरी प्र.अ ता.जि. अकोला येथील शेत सर्व्हे नं. ८२/२-४ क्षेत्र ०.६५ हे.आर जमिनीच्या निवासी प्रयोजनाकरीता अकृषक वापरास परवानगी मिळणेबाबत.

अर्जदार श्री.संजय रायराव घाटोळ रा.अकोला यांची विनंती

रामाक्र.एनओपी-३४/उमरी प्र.अ./२५/०४-०५

| भुखंड क्रमांक | एका भुखंडाचे क्षेत्र (चौ.मि.) | भुखंडकाचे प्रति चौ.मि. ०.०४ प्रमाणे अकृषक कर | जि.प.सेस | ग्राम पंचायत सेस |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | १६१.४५ | ६.८० | ४७.४५ | ६.८० |
| २. | १७५.५० | ७.०५ | ४१.१५ | ७.०५ |
| ३.-अ | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| ३.-ब | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| ४.-अ | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| ४.-ब | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| ५.-अ | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| ५.-ब | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| ६.-अ | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| ६.-ब | २२६.७५ | ५.१० | ३५.४१ | ५.१० |
| ७.-अ | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| ७.-ब | १२०.५० | ४.८५ | ३३.७५ | ४.८५ |
| ८.-अ | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| ८-ब. | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| ९.-अ | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| ९.-ब. | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| १०.-अ | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| १०.-ब | ११०.५० | ४.४५ | ३०.९५ | ४.४५ |
| ११ | १७५.५० | ७.०५ | ४१.१५ | ७.०५ |
| १२. | १७१.१५ | ६.८५ | ४७.९५ | ६.८५ |
| १३. | १८४.६५ | ७.४० | ५१.७० | ७.४० |
| १४. | १८२.०० | ७.३० | ७१.०० | ७.३० |
| १५.-अ | १११.०० | ४.८० | ३३.३५ | ४.८० |
| १५-ब | १११.०० | ४.८० | ३३.३५ | ४.८० |
| १६.- अ | १११.०० | ४.८० | ३३.३५ | ४.८० |
| १६.-ब | १११.०० | ४.८० | ३३.३५ | ४.८० |
| १७.-अ | १११.०० | ४.८० | ३३.३५ | ४.८० |
| १७.-ब | १११.०० | ४.८० | ३३.३५ | ४.८० |
| १८.-अ | १११.०० | ४.८० | ३३.३५ | ४.८० |
| १८.-ब | ११५.५० | ४.६५ | ३२.३५ | ४.६५ |
| एकुण | ३८०१.०० | १५३.०० | १०६५.०० | १५३.०० |

OFFICE OF THE SUB DIVISIONAL OFFICER
सत्यमेव जयते
AKOLA

[signature] 2006

उपविभागीय अधिकारी

अकोला

# DEMARCATED RESIDENTIAL LAYOUT IN S. NO. 82/2/4 OF MOUJA UMARI PRG. AKOLA TQ. DISST. AKOLA.




PLAN SCALE 1:500

STATEMENT OF AREA

| | AREA IN SQMT |
|---|---|
| TOTAL AREA OF RESI. PLOTS | 3801.00 |
| TOTAL AREA OF OPEN SPACE | 650.00 |
| TOTAL AREA OF ROADS (CURVATURE | 2049.00 |
| TOTAL AREA OF S.NO. 82/2/4 PT | 6500 [illegible] |




SCHEDULE OF PLOTS

| PLOT NO. | NOS OF PLOT | AREA IN SQMT. | AREA IN SQFT |
|---|---|---|---|
| 1 | 1 | 169.45 | 1823 |
| 2 | 1 | 175.60 | 1886 |
| 3AB TO 5AB | 6 | 110.50 | 1189 |
| 6A | 1 | 110.50 | 1189 |
| 6B | 1 | 126.75 | 1363 |
| 7A | 1 | 110.50 | 1190 |
| 7B | 1 | 120.50 | 1298 |
| 8AB TO 10AB | 6 | 110.50 | 1189 |
| 11 | 1 | 175.50 | 1889 |
| 12 | 1 | 17[illegible].15 | 1841 |
| 13 | 1 | 184.65 | 1987 |
| 14 | 1 | 182.00 | 1959 |
| 15AB TO 17AB | 6 | 119.00 | 1280 |
| 18A | 1 | 119.00 | 1280 |
| 18B | 1 | 115.50 | 1242 |
| TOTAL | 30 | 3801.00 | 40898 |

SEMI DETACHED PLOTS

Recommended for Final Approval as amended in ——— Colour and Subject to Conditions mentioned in this Office Letter No. ———
नगर रचना सहायक संचालक, अकोला यांचे पत्र क्र. 2960 दि. 24/11/79

24/11/79

**Assistant Director of Town Planning, Akola.**

24/11/79

*Makarand Pande*
Civil Engi.
"Shanti Niketan",
Raut wadi, AKOLA

Scanned with OKEN Scanner